# ओळख परेड

महसूल खात्यामध्ये काहीवेळा पोलिसांकडुन ओळख परेड घेण्याची विनंती करण्यात येते. परंतू याबाबत पूरेसे ज्ञान नसल्याने न्यायालयात साक्ष देतांना गोंधळ आपला उडतो, निकालपत्रात ताशेरे ओढले जातात व आरोपीच्या बाजूने निकाल दिला जातो. ओळख परेडबाबत काही माहिती खालील प्रमाणे:

फौजदारी प्रक्रिया संहिता, कलम १६२ अन्वये पोलिसांसमोर दिलेल्या जबाबावर जबाब देणाऱ्याची स्वाक्षरी नसते. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार (रामकृष्णन वि. बॉम्बे स्टेट;एआयआर १९५५, एस.सी.-१०४) ओळख परेडच्या वेळेस पोलिसांसमोर दिलेल्या जबाबावर अवलंबून राहता येत नाही. न्यायाधीशांनीही ओळख परेड घेण्यापासून मनाई आहे. त्यामुळे ओळख परेड ही जबाबदारी न्यायदानाचे काम न करणाऱ्या कार्यकारी दंडाधिकारी/मानद दंडाधिकारी दर्जाच्या अधिकाऱ्याकडे सोपवण्यात आली. (शासन परिपत्रक - गृह विभाग, क्र. एमआयएस-१०५४/८४५८८, दि. २२/०४/१९५५)

ओळख परेड म्हणजे एखादा साक्षीदार, ज्याने गुन्हा घडतांना आरोपीला पाहिले आहे, त्याने दंडाधिकारी व लायक पंचांच्या समक्ष गुन्हा घडतांना पाहिलेल्या आरोपीला ओळखणे. ओळख परेड कशी घ्यावी या बाबत उपरोक्त परिपत्रकात निर्देश दिलेले आहेत. त्यातील महत्वाचे निर्देश खालील प्रमाणे:

- ओळख परेडला जातांना तुम्ही, तुमचा लेखनिक, दोन निष्पक्ष, प्रतिष्ठित पंच, कार्यालयातील एक किंवा दोन शिपाई यांनी जावे.
- ओळख परेड आरोपी न्यायलयीन कोठडीत असतांना त्याठिकाणी जाऊन घेणे कधीही चांगले. परंतू अपवादात्मक परिस्थितीत ओळख परेड कार्यकारी दंडाधिकारी/मानद दंडाधिकारी यांच्या कार्यालयात घेतली जाऊ शकते.
- ओळख परेडच्या पंचनाम्यात खालील गोष्टींचा उल्लेख जरूर असावा:
  १. ओळख परेड घेतल्याचा दिनांक, वेळ आणि स्थळ.
  २. दोन्ही पंचांचे पुर्ण नाव, वय, व्यवसाय, पत्ता.
  ३. ओळख परेडमध्ये उभ्या असणाऱ्या 'डमींची' नावे व वय.
- ओळख परेड सुरु करून संपेपर्यंत तुम्ही अत्यंत निष्पक्ष असावे. तुमच्याकडुन कोणतीही कृती अशी घडु नये जी तुमच्या निष्पक्षपातीपणाबाबत संशय निर्माण करेल.
- ओळख परेड घेतांना दोन निष्पक्ष, प्रतिष्ठित पंच, तुमचा लेखनिक व तुम्ही, आरोपींचा एक मित्र किंवा वकील (असल्यास) यांचे शिवाय कोणीही हजर नसावे.
- ओळख परेड सुरु करून संपेपर्यंत दोन्ही पंच सतत तुमच्याबरोबरच असावे व तुम्ही ज्या-ज्या कृति करीत आहात त्यांचे वर्णन पंचनाम्यात (Running Panchanama) लिहिण्याची दक्षता घ्यावी.
- ओळख परेड सुरु करण्याआधी साक्षिदारांना भेटावे. त्यांना स्वत:ची ओळख करून द्यावी व घडलेल्या घटनेची सविस्तर माहिती विचारावी.
- ओळख परेडच्या आधी साक्षिदार आरोपींना बघणार नाहीत याची दक्षता घ्यावी.
- आरोपींची ईच्छा असल्यास त्यांना त्यांचा एक मित्र किंवा वकील ओळख परेडच्यावेळी हजर ठेवता येईल. आरोपींची तशी ईच्छा आहे काय त्याची विचारणा करावी.
- ओळख परेड घेतांना पोलिसांना ओळख परेड घेत असलेल्या खोलीत किंवा आरोपीला ते दिसतील अशा ठिकाणी हजर ठेऊ नये.

- ओळख परेड सुरु करण्याआधी आरोपींना तुमची ओळख देऊन त्यांना ओळख परेड प्रक्रियेबद्दल थोडक्यात समजावून सांगावे.
- ओळख परेड सुरु करण्याआधी साक्षिदारांना स्वतंत्र खोलीत बसवावे. ते आरोपींना पाहू शकणार नाहीत तसेच एका साक्षिदाराची साक्ष संपल्यानंतर तो पुन्हा त्या स्वतंत्र खोलीत येऊन इतर साक्षिदारांना भेटणार नाही याची सुध्दा दक्षता घ्यावी. त्या खोलीच्या बाहेर तुमचा शिपाई ठेवावा.
- ओळख परेड सुरु करतांना तुम्ही, तुमचा लेखनिक, दोन निष्पक्ष, प्रतिष्ठित पंच, आरोपींचा एक मित्र किंवा वकील (असल्यास) यांचे शिवाय इतर सर्वांना बाहेर जाण्यास सांगावे. दाराबाहेर तुमचा शिपाई ठेवावा.
- ओळख परेडमध्ये एका आरोपीसाठी सहा 'डमी' असावेत, दोन आरोपी असल्यास बारा 'डमी' असावेत. एका ओळख परेडमध्ये दोन पेक्षा जास्त आरोपी असू नयेत.
- दोन पेक्षा जास्त आरोपी असल्यास एका ओळख परेडमध्ये जास्तित जास्त दोन आरोपी व बारा 'डमी' यापटीत ओळख परेड आयोजित करावी.
- एका आरोपीची ओळख परेड घ्यायची असल्यास तुमच्या शिपायामार्फत किंवा पंचामार्फत बाहेरच्या लोकांतुन आरोपीसारखा चहेरा, केसांची पध्दत, शरीरयष्टी असणाऱ्या, अंदाजे त्यांच्यासारखा पहेराव असणाऱ्या १० ते १२ इसमांना आत बोलवावे. त्यातील आरोपीसारखे दिसणारे सहा लोक तुम्ही स्वत: 'डमी' म्हणून निवडावे. इतरांना बाहेर जाण्यास सांगुन तुम्ही निवडलेल्या 'डमींना' ओळख परेड प्रक्रियेबद्दल थोडक्यात समजावून सांगावे. त्यांना कोर्टात साक्ष द्यावी लागणार नाही याची कल्पना द्यावी. त्यानंतर त्यांना एका आडव्या रांगेत उभे राहण्यास सांगावे.
- त्यानंतर तुमच्या शिपायामार्फत किंवा पंचामार्फत आरोपीला बोलवावे, त्याला समोर उभे असलेल्या 'डमींच्या' रांगेत त्याच्या मर्जीनुसार उभे राहण्याची मुभा द्यावी. त्याला 'डमींतील' कोणा व्यक्तीबद्दल काही हरकत आहे का ते विचारावे. त्याला त्याच्या पहेरावात काही बदल करायचा आहे काय याबाबत विचारणा करावी. त्याची तशी ईच्छा असल्यास त्याला तशी मुभा द्यावी.
- पंचनाम्यात ओळख परेडमध्ये उभ्या असणाऱ्या 'डमींची' नावे व वय एकाखाली एक अशी अनुक्रमांक देऊन लिहावीत तसेच आरोपी कोणत्या अनुक्रमांकाच्या 'डमींच्या' मध्ये जाऊन उभा राहिला याचा स्पष्ट उल्लेख पंचनाम्यात करावा.
- यानंतर तुमच्या शिपायामार्फत किंवा पंचामार्फत एका साक्षिदाराला तेथे बोलवावे. त्या साक्षिदारास त्याने पाहिलेल्या घटनेचे थोडक्यात वर्णन सांगुन "तुम्ही सदर घटनेच्या वेळी बघीतल्याचा दावा करीत आहात तो इसम समोरील इसमांमध्ये उभा आहे. त्याला जवळ जाऊन, हात लाऊन ओळखा" असे सांगावे. काही साक्षिदार आरोपीच्या जवळ जाण्यास, त्याला हात लावण्यास घाबरतात. त्यावेळी 'डमीं'मधील नेमक्या आरोपी/इसमाचे नेमके वर्णन करण्यास सांगावे व त्या आरोपी/इसमाला एक पाऊल पुढे येण्यास सांगावे व खात्री करावी. नंतर साक्षिदारास जाण्यास सांगावे, यावेळी साक्ष झालेला साक्षिदार पुन्हा स्वतंत्र खोलीत बसलेल्या इतर साक्षिदारांना भेटणार नाही याची दक्षता घ्यावी.

- उपरोक्त सर्व घटना तसेच कोणी कोणाला काही प्रश्न विचारल्यास ते प्रश्न व उत्तरे पंचनाम्यात सविस्तर (Running Panchanama) लिहावीत. साक्षिदाराने आरोपीस ओळखले किंवा नाही याचा स्पष्ट उल्लेख पंचनाम्यात करावा.
- यानंतर दोनपेक्षा जास्त आरोपी असल्यास पुन्हा नवीन 'डमी' बोलवावे व पुन्हा वरीलप्रमाणे प्रक्रिया करावी. दुसऱ्या ओळख परेडमध्ये आरोपींना त्याची उभे राहण्याची जागा किंवा पेहराव बदलण्याची मुभा द्यावी.
- ओळख परेड संपल्यानंतर 'डमींना' जाण्यास सांगावे. आरोपी पुन्हा पोलीसांच्या ताब्यात द्यावे. पंचनाम्यात ओळख परेडच्या संपूर्ण प्रक्रियेच्यावेळी पोलीस त्या खोलीत हजर नव्हते याचा उल्लेख आवर्जून करावा. पंचनाम्याच्या खाली "उपरोक्त ओळख परेड मी स्वतः, पंच नामे १.------ व २.---- यांचे समक्ष घेतलेली आहे, त्यांनी याबाबत खाली स्वाक्षरी केली आहे." असे नमुद करावे, त्याखाली स्वतःची दिनांकीत स्वाक्षरी करून शिक्का उमटवावा. नंतर त्या पंचनाम्यावर दोन्ही पंचांनी खाली लिहावे: " आम्ही उपरोक्त पंचनामा वाचला आहे. किंवा उपरोक्त पंचनामा आम्हाला वाचुन दाखवण्यात आला. तो ओळख परेडच्या वेळेस जश्या घटना घडल्या त्याप्रमाणे आमच्या समक्ष अचूक लिहीला गेला आहे."  पंचनाम्यावर दोन्ही पंच, आरोपींचा मित्र किंवा वकील (हजर असल्यास) यांची दिनांकीत स्वाक्षरी घ्यावी. पंचनाम्याच्या प्रत्येक पानावर कार्यकारी दंडाधिकारी/मानद दंडाधिकारी यांनी स्वतःची दिनांकीत स्वाक्षरी करून शिक्का उमटवावा तसेच दोन्ही पंच, आरोपींचा मित्र किंवा वकील (हजर असल्यास) यांनी दिनांकीत स्वाक्षरी करावी.

  - पंचनाम्याची मुळ प्रत पोलीसांना द्यावी. एक प्रत तुमच्या कार्यालयात ठेवावी.

==================================================================